## -: प्रकरण चौथे :-

## - बाबुराव ठाकूर: पत्रकारिता -

भारतीय स्वातंत्र्य युध्दात भारतीय वृतपत्रानी गौरवास्पद भूमिका बजावली आहे. जनमत निर्माण करण्याचे अत्यंत प्रभावी अस्त्र, वृतपत्राच्या रुपात भारतीय नेत्यांच्या हाती मिळाले, आणि त्याचा संपूर्ण उपयोग त्यांनी करून घेतला. प्रश्न राष्ट्रीय भावना तीव्र करण्याचा असो वा जातीयते विरुध्द लढा देण्याचा असो, वृतपत्रानी भरीव भूमिका बजावली आहे. लोकमान्य टिळक ( १८५६-१९२० ) गोपाळ गणेश आगरकर ( १८५६-९५ ), महात्मा गांधी ( १८६९-१९४८ ), डॉ.बाबासाहेब आंबेडकर (१८९३-१९५६), इत्यादि थोर नेत्याना आपआपल्या क्षेत्रात जे वादातीत यश मिळाले त्याचे महत्वाचे श्रेय वृतपत्राना जाते.या राष्ट्रीय नेत्यांच्या पावलावर पाऊल ठेवून अनेक देशभक्तांनी वृतपत्र क्षेत्रात उडी घेतली. बाबुरावांनी सुध्दा याच मार्गाने वाटचाल केली. त्यांच्या वृतपत्र कार्याचा आढावा घेण्यापूर्वी भारतातील वृतपत्राच्या प्रगतीचा आढावा घेणे क्रमप्राप्त आहे.

भारतीय वृतपत्राच्या इतिहासाचा प्रारंभ ईस्ट इंडिया कंपनीच्या काळापासून होतो. सर्व प्रथम कांही युरोपियनानी व अँग्लो इंडियनानी आठराव्या शतकाच्या दुसऱ्या कालखंडात कांही वृतपत्रे सुरू केली [१]. परंतु त्याचे ध्येय मर्यादित होते - माहिती व मनोरंजन (Just to fold information and amusement ). या वृतपत्राना इंग्लंड आणि इतर युरोपियन देशातील वृतपत्रे व जर्नल्स मधील मजकूरावर विसंबून रहावे लागत असे.

..

भारतात छापखाना, वृत्तपत्र आणि जर्नल्सची सुरुवात कलकत्ता, मद्रास आणि मुंबई या व्यापारी शहरात झाली. भारतात कलकत्ता जनरल ॲडव्हरटाईझर (Calcutta General Advertiser ) हे पहिले वृत्तपत्र जेम्स ऑगस्टस हिके याने २९ जानेवारी, १७८० रोजी कलकत्ता येथे प्रसिध्द केले [२]. 'मद्रास क्युरियर' हे वृत्तपत्र मद्रास येथे सन १७८५ मध्ये सुरु झाले [3]. तर मुंबई राज्यात 'बॉम्बे हेरॉल्ड' सन १७८९ [४] आणि त्यानंतर 'बॉम्बे गॅझेट' सन १७९० आणि 'बॉम्बे क्युरियर' सन १७९२ मध्ये सुरु झाले [५].

महाराष्ट्रात पहिले मराठी वृत्तपत्र काढण्याचा मान बाळशास्त्री जांभेकरांचा ( सन १८१२-४६ ) आहे. दिनांक ६ जानेवारी, १८३२ मध्ये मुंबई येथे 'दर्पण' या मासिकाव्दारे त्यांनी या कामास सुरुवात केली [६]. त्यावर्षी ४ मे पासून ते साप्ताहिक स्वरुपात सुरु झाले. हे साप्ताहिक मराठी व इंग्रजी भाषेतून निघत असे. 'दर्पण' वृत्तपत्रानंतर मुंबईमध्ये 'मुंबई अखबार' आणि 'ज्ञानसिंधू' ( १८४० ), प्रभाकर ( १८४१ ), इंदुप्रकाश ( १८६२ ) इत्यादि वृत्तपत्रे निघाली.

वृत्तपत्र सुरू करण्याच्या बाबतीत प्रथमतः मुंबईने आघाडी मारली असली, तरी पुणे ( महाराष्ट्र ) मागे नव्हते. पुणे येथे 'मित्रोदय' सन १८४४ मध्ये सुरू झाले [७]. त्यानंतर 'ज्ञानप्रकाश' सन १८५९ पासून पुण्यातून प्रकाशित होऊ लागले. हीच अवस्था मुंबई राज्यातील इतर शहरांची होती. त्यास बेळगाव शहरही अपवाद नव्हते. 'बेळगाव समाचार' वृत्तपत्रापासून बेळगाव शहरात वृत्तपत्र कार्याची सुरुवात मे १८६३ पासून झाली [८]. बाबुरावांनी विद्यार्थी दशेतच वृत्तपत्र विश्वात प्रवेश केला.

..

वृतपत्र कार्याची सुरूवात:

" भारत वैभव समाज " नावाची संस्था धोंडो राजाराम ठाकूर यानी जी.एस.कुलकर्णी, एस.एस.जायदे, एस.एम.बिडीकर, पी.बी.सबनीस इ. तरूण विद्यार्थ्यांच्या मदतीने सामाजिक, शैक्षणिक व वृतपत्रीय कार्य करण्यासाठी बेळगाव येथे दिनांक २५-१०-१९१८ रोजी स्थापन केली होती [९]. त्यांच्या वृतपत्र जीवनाची सुरूवात भारत वैभव समाजाच्या स्थापनेपासून झाली. या संस्थेतर्फे " तरूण भारत " हे मासिक मे-जून १९१९ पासून बेळगाव शहरात सुरू करण्यात आले [१०]. या मासिकाच्या प्रकाशनाची संपूर्ण जबाबदारी धोंडो राजाराम ठाकूर व पेडणेकर मंगेश हरी यांच्यावर सोपविण्यात आली होती [११].

हे मासिक सुरू करण्यामागे एक महत्वाचा उद्देश होता. बेळगावात ( कर्नाटक राज्य ) वृतपत्रांची कमतरता नव्हती. श्री.सामंत भिकाजी यांचे "बेळगाव समाचार"( १८६३ - साप्ताहिक ), बाबाजी रामचंद्र सावंत यांचे " चिकित्सक " (१८८४ - मासिक ), गंगाधरराव देशपांडे यांचे " धुरीन " ( १८९७ ), वामनराव कानविंदेचे " परिक्षक ", मोरेश्वर मराठे यांचे " चैतन्य " ( १८८७ ) याशिवाय शामराव देसाईचे " राष्ट्रवीर " ( १९२० - साप्ताहिक ), ब.रा.पत्की यांचे " दक्षिण महाराष्ट्र " ( १९२० - साप्ताहिक ), हरिपंत सानोलकरांचे " खानदेश मित्र ", कुलकर्णी दत्तात्रय यांचे " मधुमक्षीका " इत्यादि मराठी भाषेतील वृतपत्रे व श्री.गाडगीळ व अभ्यंकर यांचे " सरदार " ( १९०९ ) हे मोडी भाषेतील साप्ताहिक सुरू होते [१२]. पण बहुतांशी ही साप्ताहिके, मासिके कोणत्या ना कोणत्या तरी पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत होती. ती संबंधित पक्षाचाच, विचारांचा प्रचार करीत होती. तर काही जन स्वत:साठी लोकप्रियता मिळवून घेण्यासाठी वृतपत्राचा साधन म्हणून

वापर करीत होते. या वृत्तपत्रात विद्यार्थ्यांना कोणतेच स्थान नव्हते. त्यांच्या विचाराना चालना देण्यासाठी, तरुण वर्गात वाचण्याची व लिहिण्याची आवड निर्माण करण्यासाठी एखाद्या वृत्तपत्राची गरज होती. या गरजपूर्तीसाठी 'तरुण भारत' मासिक सुरू करण्यात आले [१३]. याहून महत्वाचे म्हणजे बाबुराव ठाकूर प्रभृतीने हे मासिक सुरू करून " विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी चालविलेले महाराष्ट्रातील पहिलेच मासिक " असा बहुमान मिळविला [१४]. मासिकाचे नांव " तरुण भारत " हे तरुण पिढीचे घोतक असल्यामुळे ठेवण्यात आले. कारण तरुण पिढीवरच भारत वर्षाचे भाग्य अवलंबून आहे. मासिकाचे संपादक, प्रकाशक, लेखक व वाचक हे तरुण विद्यार्थी असल्यामुळे " तरुण भारत " हे नाव ठेवण्यात आले [१५].

तरुण भारत मासिकाचा उद्देश:

बाबुराव ठाकूर यांनी हे मासिक सुरू करण्यामागे कांही भूमिका होती. त्याचे कांही उद्देश यामागे होते. त्यापैकी:-

१) महाराष्ट्रातील विद्यार्थी वर्गात एकमेकात सहानभूती व प्रेम निर्माण करणे.

२) तरुण विद्यार्थी वर्गात सुप्तावस्थेत असलेल्या लेखन कलेस उत्तेजन देणे.

३) राष्ट्रीय प्रश्नाबाबत विद्यार्थी वर्गात जागृती निर्माण करणे व त्याना देशी-विदेशी घटनांची जाणीव करून देऊन त्यात सहभागी करून घेणे.

४) सर्व विद्यार्थी वर्गास आपले विचार व कल्पना मांडण्यासाठी, व्यक्त करण्यासाठी एक व्यासपीठ तयार करणे, कारण

..

संपूर्ण महाराष्ट्रात त्यावेळी केवळ विद्यार्थ्यांचेच विचार व कल्पना ग्रंथीत करणारे असे एकही मासिक नव्हते. मात्र अपवादात्मक कॉलेजमध्ये त्रैमासिक किंवा वार्षिक अंक निघत असत, पण त्यात सर्वच विद्यार्थ्यांना संधी मिळण्याची शक्यता फारच कमी होती.

५) शिक्षण घेत असताना व देत असताना विद्यार्थी व शिक्षकांना कोणत्या अडचणी येतात व ते मांडण्यासाठी हे मासिक सुरू केले.

वरील उद्देश समोर ठेवून "तरूण भारत" मासिक सुरू करण्यात आले [१६], पण बाबुराव ठाकूर वगैरे विद्यार्थ्यांनी धाडस करून साहसाने 'तरूण भारत' मासिक स्वरूपात सुरू केले. त्यास वाचक, लेखक व विद्यार्थ्यांकडून भरघोस पाठिंबा मिळाला.

<u>तरूण भारत मासिकाचे धोरण:</u>

बाबुराव ठाकूर यांनी 'तरूण भारत' मासिक सुरू केल्यानंतर त्याचे धोरण कसे राहिल हे स्पष्ट केले होते [१७]. ते खालीलप्रमाणे आहे:-

१) विद्यार्थ्यांचा जो पक्ष असेल तोच मासिकाचा राहील.

२) शक्य तेवढी जास्त 'तरूण भारत' विद्यार्थ्यांची बाजू राखण्याचा प्रयत्न करील.

३) 'तरूण भारत' मासिकात केवळ विद्यार्थी वर्गाचेच लेख छापून त्यांच्या लेखन कलेस उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला जाईल, पण विद्यार्थ्यांकडून अपेक्षेप्रमाणे लेख आले नाहीत, तर इतरांचे लेख छापले जातील, मात्र ते शिक्षण विषयक असले पाहिजेत.

..

४) वादग्रस्त राजकीय बाबी शेरीज इतर सर्व बाबतीत, विशेषत: शिक्षण व सामाजिक विषयावर तरूण भारत मध्ये लेख प्रसिध्द होतील.

५) विद्यार्थी वर्गात वाचनाची अभिरूची वाढविण्याचा व लेखन कलेत प्राविण्या संपादन करण्याच्या कामी प्रयत्न केले जातील.

६) इंग्लीश शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या लेखन कलेस वाव देण्यासाठी मासिकात इंग्लीश लेख प्रसिध्द करण्यासाठी कांही पृष्ठे राखून ठेवली जातील.

७) जातीय व धार्मिक गटाच्या संबंधात बिघाड होईल असे लिखाण छापले जाणार नाही.

" तरूण भारत " हे वृतपत्र सुरू करण्याचे उद्देश व ते सुरू केल्यानंतर त्याचे धोरण काय राहिल हेही बाबुराव ठाकूर यानी निश्चित केले होते व या ध्येय धोरणानुसार सतत वाटचाल केल्यामुळे " तरूण भारत " वृतपत्राची सतत प्रगती होत गेली.

तरूण भारताची प्रगती:

" भारत वैभव समाजा " मार्फत बेळगाव शहरात वाचनालय, ग्रंथालय, साक्षरता प्रसार, स्वयंसेवक संघटना अशा प्रकारचे कार्य सुरू केले होते. तेंव्हा समाजाच्या तरूण विद्यार्थ्यांनी संस्थेचे पुढील पाऊल म्हणून एक मासिक हस्तलिखित असावे का छापून प्रसिध्द करावे याबाबत बरीच चर्चा करून छापून प्रसिध्द करण्याचे ठरविले व मासिकाच्या संपादन व प्रकाशनाची जबाबदारी तरूण विद्यार्थी श्री. मंगेश हरी पेडणेकर व धोंडो राजाराम ठाकूर यांच्यावर सोपविण्यात आली [१८]. अशाप्रकारे मे, जून १९१९ मध्ये ३६ पानी " तरूण भारत " मासिकाचा जन्म झाला. या मासिकाचे

..

मुखपृष्ट महावीर छापखान्यात व बाकीची सर्व पाने सिटी प्रिंटींग प्रेस, बेळगाव येथे छापून हे मासिक बेळगाव, समादेवी गल्ली, घर नंबर ३४४७, येथे प्रसिध्द करण्यात आले [१९]. दर महिन्याच्या पंचवीस तारखेस " तरूण भारत " प्रसिध्द होत असे [२०].

हे मासिक विद्यार्थी वर्गात लोकप्रिय करण्याकरिता व पर्यायाने वाचक वर्ग वाढविण्याकरिता या मासिकाने विविध प्रकारचे लेख, विनोदी, ऐतिहासिक गोष्टी, कविता, इंग्रजी लेख व वाचकांचे मासिकासंबंधी अभिप्राय, सूचना, विद्यार्थी वर्गात स्वराज्याभिमान निर्माण होईल अशा गोष्टी, ललित लेख, धार्मिक विचारांचे लेख, लोकमान्यांची आकाशवाणी, विवेकानंदवाणी, सत्याग्रही लेखकांचे लेख इत्यादि विविध सदराचा समावेश होता [२१].याशिवाय मासिक अनेक रंगात, सुंदर चित्रानी भरलेला असे. त्यामुळे तो सुबक दिसत असे. तसेच अनेक महान व्यक्तिंचे कार्य, चरित्र, उदा. लोकमान्य टिळक [२२], देशबंधु चित्तरंजनदास [२३] छापले जाई. श्री.पुंडलीकजी कातगडे, चलो चंपारण्य अधिकार वाणी लेख [२४] व बाबुराव ठाकूर 'तरूण भारत' मधून " हे तरूण हिन्दुस्थाना " " तारूण्य " हे धाडस, करारीपणा व आत्मत्याग यानी भरलेले असते, " स्वदेश भक्त ", " देशके बंधनोमे हमारा बंधन " असे संपादकीय लिहून तरूण वर्गात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला [२५]. मासिकातील विविध मजकूरामुळे व त्यांच्या आकर्षक मांडणीमुळे, अक्षर टाईप मोठा ( १४ पाईंट ) वापरल्यामुळे व लेखकाचे नाव चौकटीत किंवा वेलबुट्टीच्या नक्षीमध्ये किंवा फुलांच्या चौकटीत मोठे पण आकर्षकरित्या देण्यात येत असे [२६]. त्यामुळे थोड्याच कालावधीत " तरूण भारत " विद्यार्थी वर्गात प्रिय झाले. " तरूण भारत " ची लोकप्रियता बेळगाव पुरतीच सिमित राहिली नाही. ते मुंबई, पुणे, सांगली येथेही जात असे [२७].

..

छपाई यंत्रातील बदल:

१) तरुण भारत: हाताचे दाब यंत्र (Hand Press Machine ):

वृतपत्र चालविण्यातील मुख्य अडचण म्हणजे बाबुरावाकडे स्वत:चा छापखाना नव्हता. छपाई बाबत परस्वाधीन असल्याने बाबुरावासमोर कांही प्रश्न निर्माण झाले होते. स्थानिक छापखान्यावर त्यांना विसंबून रहावे लागत असे. सन १९१९-१९२२ या काळातील बहुतेक अंक धनंजय छापखान्यात छापण्यात आले होते. त्यामुळे अंक दर महिन्याच्या २५ तारखेस प्रसिध्द होईल असे जाहीर करून सुध्दा होत नव्हता, म्हणून त्याना अनेकवेळ दोन महिन्याचा जोड अंक काढावा लागला. परिणामत: वाचकांची गैरसोय होत असे. तेंव्हा ती टाळण्याच्या हेतूने बाबुरावांनी मासिकासाठी लहानसा छापखाना बसविला त्यास ' हाताचे दाब यंत्र ' म्हणतात [२८]. या यंत्रावर मे,१९२२ चा अंक छापून प्रसिध्द केला. तेंव्हापासून मासिक नियमित वेळेवर निघू लागले.

पण जसजसा तरुण भारतचा व्याप वाढू लागला, तेंव्हा कमी वेळात, अधिक अंक काढण्याची आवश्यकता भासू लागली. तेंव्हा हाताचे दाब यंत्राऐवजी आधुनिक यंत्र बसविण्याची गरज निर्माण झाली. म्हणून जुलै,१९२३ मध्ये बाबुरावांनी ट्रेडल यंत्र छापखान्यात बसविले [२९]. या यंत्रावर प्रथम हाताने अक्षर जुळणी करून ते आयाताकृती चौकटीत बसवावी लागत असे. त्या नंतर ती चौकट यंत्रावर बसवून छपाई करता येत असे. या छपाई यंत्रावर १८" x १२" ( लांबी x रुंदी ) ची छपाई होत असे. हाताचे दाब यंत्रापेक्षा या यंत्रावर अधिक गतीने छपाई होऊ लागली. पण ट्रेडल यंत्र सुध्दा कमी पडू लागले म्हणून जून १९२४ मध्ये बाबुरावांनी ट्रेडल यंत्राबरोबर अधिक आधुनिक ' सिलेंडर छपाई यंत्र ' बसविले [30]. या यंत्रावर छपाईसाठी कागद ठेवणे व छपाई झालेला कागद काढणे हे आपोआप होत असल्यामुळे

..

आणि १८"x१२" पेक्षा मोठया आकारात छपाई करता येत असल्यामुळे छपाईच्या कामात क्रांतीकारक गति आली.

याशिवाय 'तरुण भारतच्या' विकासासाठी डॉ.गोविंदराव वामन हेरेकर यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांची समिती नियुक्त करण्यात आली होती [३१]. या समितीच्या, बाबुराव ठाकूर यांच्या प्रयत्नामुळे व मासिकातील विविध विषयावरील दर्जेदार लेख ( ललित, ऐतिहासिक, पुस्तक परिक्षण इ. ) आणि वार्ता विशेष हे सदर सुरु करुन देशातील कांही भागातील महत्वाच्या घटना चौकटीत दिल्या जात असत. त्यामुळे या मासिकाची प्रगति होत होती. पण मासिक चालविणे अनंत अडचणीचे होते. बाबुराव ठाकूर यांच्याकडे भांडवल नाही, देश पारतंत्र्यात आहे. त्यामुळे विचार स्वातंत्र्य नाही अशा अनंत अडचणींना तोंड देत सप्टेंबर,१९२४ पर्यंत हे मासिक चालू ठेवले. पण आर्थिक अडचणीमुळे आक्टोबर,१९२४ पासून हे मासिक बंद पडले [३२]. बाबुरावांचा सन १९२१ ते १९२८ हा काळ आर्थिक ओढाताणीत गेला. बाबुराव महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्याच्या आंदोलनात सक्रीय उतरले होते. तेंव्हा बेळगाव परिसरात कॉंग्रेस पक्षाचे धोरण, कार्यक्रम याचा प्रसार करण्यासाठी साधन हवे होते असे वाटल्यावरुन पुनश्च हरी ओम ( ॐ ) म्हणून तारीख १ ऑगष्ट,१९२८ या लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीच्या शुभ मुहूर्तावर साप्ताहिक स्वरूपात 'तरुण भारतचे' पुनरुज्जीवन करण्यात आले [३३].

## आधुनिकीकरण:

बाबुरावांनी स्वत:चा छापखाना कसा सुरु केला आणि हाताचे दाब यंत्रा (१९२१ ) पासून ते सिलेंडर छपाई यंत्र ( १९२४ ) बसविण्यापर्यंत छापखान्याचे कसे आधुनिकीकरण केले याचा संदर्भ घेतलाच आहे. तारीख

..

१ ऑगस्ट,१९२८ रोजी त्यानी 'तरुण भारतचे' साप्ताहिक स्वरूपात पुनरुज्जीवन केले ते १५" x १०" ( लांबी रुंदी ) च्या आकाराचे १२ पानी अंक सुरू करून मुख पृष्ठावर विविध रंगाच्या शाईचा वापर करून मोठया अक्षरात साप्ताहिकाचे नाव आकर्षकरित्या छापले होते [३४]. जवळ जवळ १९५५ पर्यंत नाव देण्याच्या प्रकारात फारसा बदल करण्यात आलेला नाही.

तरुण भारत वृतपत्राच्या अक्षरामध्ये पण कालानुरूप बदल करण्यात आले. सुरुवातीला 'तरुण भारत' करिता १४ पॉईंट अक्षराचा वापर करण्यात आला. पण पुढे सन १९२२ मध्ये आकाराने लहान पण अधिक आकर्षक अशा १२ पॉईंट टाईपचा वापर करण्यात येऊ लागला, तो १९२४ पर्यंत वापरत असल्याचे दिसते [३५].

'तरुण भारतचे' पुनरुज्जीवन केल्यावर १९२८ मध्ये त्यांनी ४८ पॉईंट टाईप पर्यंतच्या अक्षरांचा वापर केला. पुढे जवळ जवळ १० वर्षे तरुण भारतने वापरलेला मोठयात मोठा टाईप हाच होता. पण १९४० मध्ये त्यानी 'तरुण भारत' छपाई करिता ७२ पॉईंट पर्यंतचा अक्षर टाईप वापरला [३६].

'तरुण भारतची' सजावट खुलविण्यासाठी बाबुरावांनी या विभिन्न अक्षर टाईपचा वापर केला. ठळक बातमीच्या शीर्षकाकरिता ७२ पॉईंट टाईप अक्षराचा वार केला जात असे. त्या खालील महत्वाचा मजकूर ४८ पॉईंट मध्ये दिला जात असे व सविस्तर बातमी १४ किंवा १२ पॉईंटच्या टाईपमध्ये छापली जात असे [३७].

महत्वाच्या बातम्याचे शीर्षक मोठया टाईपच्या अक्षरात असल्यामुळे वाचकांचे लक्ष आपोआप त्याच्याकडे जात असे. अक्षराच्या विविधतेमुळे 'तरुण भारतचे' वाचन कंटाळवाने होत नसे.

..

बाबुरावांनी विविध टाईपच्या अक्षरांचा 'तरूण भारत' सजविण्यासाठी जसा वापर केला, तसाच विविध रंगाच्या शाईचा सुध्दा वापर केल्याचे आढळते. एखादे वृत्त महत्वाचे असेल तर त्याकरिता ते वाचकांना आकर्षित करण्याकरिता वेगळया शाईचा वापर करीत असत. त्यामुळे अंकाला उठावदारपणा येत असे. अनेकदा महत्वाच्या घटनेवरील माहिती बरोबरच घटनेशी संबंधित रंगी-बेरंगी फोटोसुध्दा छापीत असत [३८]. त्यामुळे वाचकांचा वृत्तपत्र वाचनातील आनंद व्दिगुणीत होत असे.

वृत्त देण्यामागे जशी विविधता होती, तशी जाहिरात देण्यामध्ये सुध्दा दिसते. विविध आकाराचे अक्षर टाईप वापरून जाहिरातीचा आकर्षकपणा वाढविण्यात येत होता हे 'तरूण भारत' चे अंक चाळल्यावर दिसून येते. मुख्य जाहिरात ४८ पाईंट मध्ये, तर तत्संबंधीच्या मजकूरासाठी १८ किंवा १४ पॉईंट टाईप अक्षराचा वापर करीत असल्याचे आढळते [३९]. एकच जाहिरात वेगवेगळया रंगात छापलेल्या दिसतील.

बाबुरावांनी तरूण भारतचा वाचक वर्ग वाढविण्याकरिता तरूण भारतमध्ये विविध सदर सुरू केल्याचे अंक चाळल्यानंतर दिसते. करमणूकीचे साधन म्हणून सिनेमाची लोकप्रियता वाढत होती. सिनेमाच्या लोकप्रियतेचा वापर बाबुरावांनी तरूण भारतचा खप वाढविण्यासाठी केला. सन १९३५ पासून त्यांनी सिनेमा जगत हे सदर सुरू केले. पण १९४० पासून वेगळया चौकटीत विविध फोटोंचा - रंगाचा वापर करून आकर्षक स्वरूपात हे सदर छापण्यात येऊन लागले [४०].

दुसरे महायुध्द सुरू झाल्यावर सन १९४० पासून ' युध्दावार्ता ' हे नवीन सदर चौकटीत सुरू करण्यात आले [४१] आणि यातून युध्द विषयक ठळक बातम्या देण्यास सुरूवात केली. सन १९३३ पासून ' वर्तमानसार '

..

या सदरातून जिल्ह्या बाहेरील महत्वाच्या घटनांचा मोजक्या शब्दात आढावा घेण्यात येत असे [४२]. उदा. जमखंडी येथील संस्थानाने तेथील ' संस्थानी स्वराज्य ' या वृतपत्राकडून दोन हजार रुपयाचा जामीन दरबाराने मागितल्याचे सांगून त्याचा निषेधही केला. जिल्ह्यात घडणाऱ्या ठळक घटनांचा मागोवा ' वार्ता विशेष ' या सदरातून घेतला जात असे [४३]. हे सदर चौकटीत असे पण हे सदर एका ठराविक पानावरच दिले जात नसे कधी पान एकवर, तर कधी पान तीनवर, तर कधी पान पाचवर, घडलेल्या घटनांच्या महत्वाच्या कमी जास्तपणावरून देण्यात येत असल्याचे आढळले. या सदराचे नाव २४ पॉईंट टाईप अक्षरात, तर मजकूर १२ पॉईंट टाईपच्या अक्षरात आकर्षकरित्या छापला जात असे.

तरूण भारत वृतपत्राचा खप वाढावा, वाचक वर्ग मोठया प्रमाणात मिळावा यासाठी बाबुरावांनी प्रसंगानुरूप खास पुरवणी, खास अंक, विशेषांक काढल्याचे दिसते [४४]. उदा. डॉ. हेरेकर मृत्यू खास पुरवणी (२६-१-१९५०), कॉंग्रेस सुवर्ण महोत्सवी खास अंक (२८-१२-१९३५), मराठी साहित्य सम्मेलन विशेषांक (१२-५-१९४६), पांगिरे प्रकरण खास अंक (११०-४-१९४५), 'तरूण भारत' रौप्यमहोत्सवी अंक (८-१-१९५४) इत्यादि अनेक प्रकारचे खास अंक काढून वाचक वर्ग वाढविला. परिणामत: तरूण भारतची लोकप्रियता दिवसे दिवस वाढू लागली. १ जानेवारी, १९४९ पासून तरूण भारतने प्रगतीचा पुढचा टप्पा गाठला, साप्ताहिकाचे रूपांतर अर्धसाप्ताहिकात करण्यात आले [४५].

विविध लेख:

'तरूण भारताचे' महत्वाचे आकर्षण म्हणजे विविध विषयावरील औचित्यपूर्ण लेख असेच म्हणावे लागेल. विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तिनी अशा प्रकारचे लेख लिहिले हे दुसरे वैशिष्ट्य होय. त्यात प्रामुख्याने न.रा.फाटकांचा ' महाभारत हा राष्ट्रीय ग्रंथ होय ', प्रा.अनंत काणेकरांचे

..

" अनुभव संपन्न जीवनाचे सुंदर चित्रण " व " आनंदाचा लाभ देणे घेणे हितावह ", कर्नाटक सिंह गंगाधरराव देशपांडेचा " १९४२ च्या कारावासातील अविस्मरणिय प्रसंग, कुमारप्पाचा, " ग्रामोघ्योग चळवळीचा हेतू, " सौ. इंदुमती नाईक यांचा " सध्यस्थितीत स्त्रियांची कर्तव्य " इ. प्रसिध्द लेखकांच्या लेखाचा उल्लेख करावा लागेल [४६].

तरुणांना कॉंग्रेस प्रेरीत स्वातंत्र्य चळवळ बलवान करण्याकरिता बाबुरावांनी 'तरुण भारत' मधून अनेकदा आवाहन केले. उदा. तरुणांनो हिन्दुस्थानचे भविष्य तुमच्या हातात आहे, तरुणांनो कॉंग्रेस कार्यक्रमात सहभागी व्हा, कॉंग्रेस चळवळ बलवान करा, कॉंग्रेसला मत म्हणजे स्वातंत्र्याला मत, कांही राजनिष्ठांचा विलाप इ. प्रमुख लेखांचा उल्लेख करावा लागेल [४७].

खास तरुण वर्गाकरिता मुख्यत्वे करुन विद्यार्थी वर्गाकरिता 'तरुण भारत' मधून अनेक लेख प्रसिध्द करण्यात आले. विशेषत: दामोधर नरहरी (बारामती) यांचा " विद्यार्थ्यांचे कर्तव्य ", श्री. सातवळेकरांचा " तरुणाचे ब्रम्हचर्य ", कातवडे पुंडलीकजींचा " अधिकारवाणी " इ. कांही लेखांचा उल्लेख करावा लागेल [४८].

तसेच डी.आर.ठाकूरांचा " मृतात्म्यांचे आत्मकथन ( १९१९ ), व नेपोलियनची अखेरची लढाई (१९२३ ), कृ.ह.दीक्षितांचा " रावबाजीवरील आरोप (१९२२), एम.एच.पेडणेकरांचा " रशियन राज्य क्रांती (१९२२), पुंडलीकजी कातगडे यांचा " साम्यवादी रशियाची प्रगती "(१९३३), आदि ऐतिहासिक व आर्थिक लेख अनेक लेखकांचे छापले जात असत [४९]. त्यामुळे 'तरुण भारत' मध्ये राजकीय, आर्थिक, ऐतिहासिक, साहित्यिक अशा वेगवेगळया प्रकारचे लेख छापले जात असल्यामुळे वाचक वर्ग वाढल्याचे दिसते.

..

तरूण भारत: कांही आर्थिकबाबी:

इतर कोणत्याही व्यवसायाप्रमाणे वृतपत्र व्यवसाय व्यवस्थित चालविण्यास आर्थिक पाया मजबूत असावा लागतो. अनेक वृतपत्रे आर्थिक अडचणीमुळे बंद पडल्याचे अनेक उदाहरणे आढळतात. बाबुरावांनी स्वत: चालविलेले " तरूण भारत " च आर्थिक कारणासाठी सन १९२४ मध्ये बंद पडले होते. सन १९२८ मध्ये त्यांनी त्याचे पुर्नमुद्रण सुरू केले आणि अखंडपणे ते प्रसिध्द होत गेले, व होत आहे. यात बाबुरावांची व्यवसाय कुशलता दिसून येते." तरूण भारत " यशस्वीपणे चालविणे एक प्रकारची तारेवरची कसरतच होती. कारण तरूण भारतचा मुख्य उद्योग धंदेवाईक दिसून येत नाही. त्यास उत्पन्नाची साधने मर्यादित होती. त्याच्या उत्पन्नाच्या साधनाचे मुख्यत: आपणास तीन भाग पाडता येतील. ते असे (१) देणगी, (२) वर्गणी, आणि (३) जाहिराती.

(अ) देणगी:

'तरूण भारत' मासिक सन १९१९ मध्ये सुरू करताना बाबुरावांची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. तेंव्हा त्यांनी आपल्या वृतपत्रातून सतत " विद्यार्थ्यांच्या या नवीन उपक्रमास देणगी द्या " [50] अशी विनंती केली, त्यामुळे शहरातील अनेक श्रीमंत लोकांनी १०१ ते ५-०० रूपयापर्यंत देणगी दिल्याचे संदर्भ १९१९-१९२४ पर्यंतचे तरूण भारतचे अंक चाळल्यानंतर दिसून येते. कारण ज्या ज्या व्यक्तिनी केंव्हाकेंव्हा देणगी दिली आहे, त्यांचे आभार त्यानी मासिकातून मानल्याचे दिसते.

याशिवाय बाबुरावानी पैसा उभा करण्यासाठी जून १९२२ मध्ये खालील मार्ग अवलंबिले [51].

..

१) समासद:

दर वर्षास कमीत कमी ३ रुपये अगर दर महिन्यास कमीत कमी चार आणे देऊन संस्थेचे समासद होता येते. त्याना अंक मोफत मिळेल.

२) संस्थेचे आश्रयदाते:

संस्थेस एकदम १०० रुपये किंवा त्याहून अधिक देणगी देणा-यास आश्रयदाते म्हणून घेण्यात येईल.

३) कायम समासद:

संस्थेस एकदम ५० रुपये पासून १०० रुपयापर्यंत देणगी देणा-यास संस्थेचे कायम समासद म्हणून घेण्यात येईल.

४) फंडपेटी:

संस्थेची फंड पेटी दर शनिवारी गावातून फिरत असे [५२] तेंव्हा त्या पेटीत अनेकजण देणगी दाखल पैसे टाकत असत.

बाबुरावानी १९२३ मध्ये ट्रेडल छपाई यंत्र व १९२४ मध्ये सिलेंडर छपाई यंत्र बसविले ते नागरिकांनी उदार हस्ते देणग्या दिल्यामुळेच शक्य झाले असे बाबुरावानी मान्य केले आहे [५३].

तसेच १९२८ मध्ये तरुण भारतचे पुनरुज्जीवन करताना सुध्दा नागरिकांनी त्याना देणगी दिल्याचा उल्लेख सापडतो. पण १९२९ नंतर देणगी दिल्याचा उल्लेख मिळत नाही. अशाप्रकारे देणगी रुपाने त्यानी पैसा उभा केला.

..

ब) वर्गणी:

'तरूण भारत' वृतपत्राच्या उत्पन्नाचे नियमित साधन म्हणून वर्गणीचा उल्लेख करावा लागेल. तसेच 'तरूण भारत' हे " विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी चालविलेले मासिक " असल्यामुळे वर्गणीत त्यांना खास सूट असे हे या मासिकाचे दुसरे वैशिष्ट होय. तरूण भारतच्या वर्गणीचे दोन विभाग पाडता येतात (१) इतरासाठी (२) विद्यार्थ्यांसाठी. या दोघासाठी सारखीच वर्गणी नसे. उदा:

| अ.नं. | | इतरासाठी | विद्यार्थ्यांसाठी |
|---|---|---|---|
| १) | वार्षिक वर्गणी | २-०-० | १-१२-० |
| २) | सहामाही वर्गणी | १-४-० | १-००-० |
| ३) | किरकोळ अंकास | ०-४-० | ०-०३-० |

अशा प्रकारे वर्गणी होती [५४].

या वर्गणीत डिसेंबर १९२० पर्यंत बदल करण्यात आला नाही, पण जानेवारी,१९२१ मध्ये पुढील प्रमाणे बदल करण्यात आला.

| अ.नं. | | इतरासाठी | विद्यार्थ्यांसाठी |
|---|---|---|---|
| १) | वार्षिक वर्गणी | २-२-० | १-१३-० |
| २) | सहामाही वर्गणी | १-८-० | १-४-० |
| ३) | किरकोळ अंकास | ०-४-० | ०-३-० |

यावरून किरकोळ अंकाची किंमत वाढली नाही हे दिसते. पण डिसेंबर १९२१ ते एप्रिल,१९२३ पर्यंत वर्गणीत खालीलप्रमाणे बदल करण्यात आला.

..

पण डिसेंबर १९२१ ते सप्टेंबर १९२४ या कालावधीत 'तरुण भारत'ची वर्गणी सारखीच होती, फक्त इतरासाठीच्या वार्षिक वर्गणीत केवळ दोन आणे वाढ केली [५५].

सन १९२८-१९५५ पर्यंत वर्गणी रुपाने खालीलप्रमाणे उत्पन्न मिळविले हे 'तरुण भारतच्या' दप्तरी असलेल्या रेकॉर्डवरुन दिसते [५६]. सन १९२८ मध्ये तरुण भारतचे पुनरुज्जीवन केले तेंव्हा वर्गणी खालीलप्रमाणे होती. वार्षिक, स्थानिक २ रुपये, एम.ओ.बाहेरगावी २ रुपये १३ आणे, व्ही.पी.ने ३ रुपये व किरकोळ अंकास १ आणा होती. तर विद्यार्थ्यांसाठी बाहेरगावी २ रुपये १२ आणे वर्गणी होती. हीच वर्गणी १९३५ पर्यंत होती. परंतु १९३० पासून सर्वांसाठी सारखी वर्गणी निश्चित करण्यात आली.

सन १९३५ ते १९४० पर्यंत किरकोळ अंकाची किंमत ३ आणे पर्यंत वाढविण्यात आली, पण १९४१ ते १९४८ पर्यंत किरकोळ अंकाची किंमत कमी करुन २ आणे निश्चित करण्यात आली, तर वार्षिक स्थानिक किंमत ३ रुपये, बाहेरगावी ३ रुपये १२ आणे निश्चित करण्यात आली.

सन १९४९-१९५३ पर्यंत 'तरुण भारत' वृत्तपत्राची वर्गणी साधारणपणे खालीलप्रमाणे होती:

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी ( स्थानिक ) | रु.४-०-० |
| वार्षिक वर्गणी (परगांवी) | रु.५-१०-० |
| किरकोळ | रु.०-१-० |

पण सन १९५४ मध्ये यात वाढ करण्यात आली ती खालीलप्रमाणे होती. वार्षिक स्थानिक रु.४-८ आणे, बाहेरगावी रु.६-०-००, किरकोळ अंकास १ आणा अशी होती.

..

इ.स.१९५५ मध्ये स्थानिक ( वार्षिक ) ५ रुपये, परगावी ६ रुपये व किरकोळ अंकास १ आणा अशी होती.

क) जाहिरात:

वृतपत्रासाठी जाहिरातीव्दारे पैसा उभा करता येऊ शकतो, पण तरूण भारतचे जाहिरातीचे दर सप्टेंबर १९२४ पर्यंत ठराविक असल्याचा लेखी उल्लेख सापडत नाही. जाहिरातीचे ठराविक दर नव्हते, तर वर्षासाठी, सहा महिन्यासाठी, तीन महिन्यासाठी, महिन्यासाठी, पंधरा दिवसासाठी असे करार करून बिल आकारले जात असे, असे दिसते. उदा.सिनेमाच्या जाहिरातीसाठी वर्षाला १०० रुपये द्यावेत असे ढोबळमानाने ठरलेले असे, पण त्यात कमी जास्त होत असे.

पुढे तरूण भारतचे साप्ताहिकात रुपांतर झाल्यावर सन १९२८ ते १९३३ पर्यंत जाहिरातीचा दर इंग्रजी किंवा मराठी दर ओळीस चार आणे आणि पुढच्या वेळीपासून दर ओळीस तीन आणे आकार व शीर्षिकास आकार वेळगा आकारला जाई [५७]. पुढे जाहिरातीचे दर असेच कायम राहिले. फक्त मुदतीच्या जाहिरातीत बदल केला गेला तो सन १९४५ पर्यंत कायम होता [५८]. मुदतीच्या जाहिरातीचे दर खालीलप्रमाणे होते.

मुदतीच्या जाहिरातीस दर स्पेस सिंगल कॉलमास दर इंचास

| | | | |
|---|---|---|---|
| लागोपाठ चार वेळा दिल्यास | | .. | १२ आणे |
| ,, ,, ,, | बारा ,, | .. | १० आणे |
| ,, ,, ,, | चोवीस ,, | .. | ८ आणे |
| ,, ,, ,, | अठ्ठेचाळीस ,, | .. | ६ आणे |

असा आकार होता.

..

जानेवारी १९४६-१९५२ पर्यंत जाहिरातीचे ( अ ) सरकारी आणि (ब) खाजी असे दोन विभाग करून त्यांचे वेगवेगळे दर होते [५९]. (अ) सरकारी जाहिरातीसाठी सिंगल कॉलम इंचास २ रूपये ८ आणे होता, तर (ब) खाजगी जाहिराती यात पूर्वीच्या आकारात वाढ केली आहे, ती किती याबाबत तरूण भारत कार्यालयामध्ये चौकशी करावी असे वृतपत्रात नमूद केले होते. तथापि कार्यालयात ही माहिती उपलब्ध नाही.

जानेवारी १९५३ ते १९५५ या काळात जाहिरातीचे (१) सरकारी, (२) खाजगी मोठया जाहिराती, (३) खाजगी छोटया जाहिराती,असे तीन प्रकार पाडल्याचे आढळतात [६०]. सरकारी जाहिरातीचा दर सन १९४६-५२ पर्यंतचाच होता, खाजगी मोठया जाहिरातीचा दर पेपरवर नमूद केलेला नव्हता, आणि छोटया जाहिरातीचे दर पुढील प्रमाणे होते.

जाहिरात प्रसिध्द करण्यास पहिल्या १५ शब्दापर्यंत १ रूपये ४ आणे, पुढील प्रत्येक शब्दास १ आणा आकार पडेल. छोटी जाहिरात ४० शब्दापेक्षा मोठी असू नये असे होते.

वर नमूद केलेल्या साधनाव्दारे ' तरूण भारतला' उत्पन्न मिळत असे, असे ढोबळ मानाने सांगता येते. पण तरूण भारतचे एकूण उत्पन्न किती, वर्गणी, जाहिरातीव्दारे ते किती मिळत असे याची माहिती उपलब्ध नाही. पण तरी सुध्दा ढोबळमानाने वृतपत्र यशस्वीरित्या चालविण्यात बाबुराव यशस्वी झाले होते. वृतपत्र क्षेत्रात स्पर्धा होतीच. तरूण भारत व्यतिरिक्त, बेळगाव समाचार (१८६३), राष्ट्रवीर ( १९२० ), आदि वृतपत्रे बेळगाव मधून प्रसिध्द होत असत. तरूण भारतची आर्थिक घडी व्यवस्थित बसवून, तरूण भारतमध्ये योग्य बदल करून ते या स्पर्धेत यशस्वी झाले.

..

तरुण भारत संबंधी सरकारचे धोरण:

सुरुवातीस म्हणजे १९१९-१९२४ पर्यंत तरुण भारतचे स्वरूप मवाळ होते. राजकीय प्रश्नापेक्षा, विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नात तरुण भारतला स्वारस्य होते. त्यामुळे सरकारवर अथवा सरकारी धोरणावर टीका करण्याचा प्रश्नच नव्हता, पण अत्यंत सावधपणे तरुण वर्गात जागृती निर्माण करण्साठी तरुण भारतने पाऊल उचलल्याचे दिसते.

पण सन १९२८ पासून तरुण भारतचे मूलभूत स्वरूप व धोरण बदलले. बाबूराव स्वत: स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय उतरल्यामुळे तरुण भारतने सुध्दा तरुण वर्गात स्वातंत्र्याची भावना निर्माण करण्यास वाहून घेतले. सरकार विरुध्द, सरकारच्या अन्यायी दडपशाही विरुध्द तरुण भारतने मोहीम सुरु केली व सरकार विरोधी भावना तीव्र बनविल्या. स्थानिक बातम्या भडक स्वरूपात मांडून स्थानिक प्रश्नाबाबत जनतेत जागृती करीत असत. त्यामुळे सरकारची वक्रदृष्टी तरुण भारतकडे वळली. त्याची सर्व प्रथम प्रचिती १९३० मध्ये आली. सन १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळ प्रसंगी तरुण भारतला कॉंग्रेस कार्यकर्त्यांचे केंद्राचे स्वरूप आले होते. दोन वेळा ऑफिसची पोलीसानी झडती घेतली. एवढेच नव्हे तर सन १९३० मध्ये चांगल्या वर्तणुकीचा रुपये दोन हजारांचा जामीन बाबुरावाना मागितला [६१]. त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने गावातील लोकानी वर्गणी जमा करून जामिनकीची रक्कम बाबुरावांच्या परस्पर भरून टाकली .

सन १९४२ मध्ये बेळगाव येथील किराणा व्यापारी श्री.पाटणेकरांचा माल आकसाने फुड इन्स्पेक्टर श्री.बुरजी यानी जप्त करून त्यांच्यावर केस दाखल केली तेंव्हा बाबुरावांनी फुड इन्स्पेक्टर बुरजींचा नंगानाच [६२] या मथळ्याखाली या पाटणेकर खटल्याची इथंभूत सर्व माहिती प्रसिध्द केली.

..

तेंव्हा मलतेच छापाल तर पश्चाताप कराल अशी धमकी बाबुरावाना देण्यात आली.

सन १९४४ चे पांगीरे प्रकरणास बाबुरावानी प्रसिध्द देताच सरकारने त्यांच्यावर सतत नजर ठेवली. एवढेच नाही तर कोल्हापूर पंतप्रधान मा. मिचेल यांनी पांगीरे प्रकरणात तरूण भारतकारानी परीचा कावळा केला म्हणून टीकेची झोड उठविली [६३]. तरीही बाबुरावांनी माघार घेतली नाही.

सन १९५२ च्या राजगिरे प्रकरणी असेच बाबुरावावर पोलिस व सरकारी अधिका-याकडून दबाव येत होता. तसेच १९५५ च्या गुर्लहोसूर सून प्रकरणाबाबतही बाबुरावावर सरकारी अधिका-यांचे सतत दडपण येते होते [६४], पण ते आपल्या ध्येयापासून विचलीत झाले नाहीत.

बाबुरावांनी अन्याया विरूध्द वाचा फोडण्यासाठी तरूण भारतला राबविले. त्याकरिता सरकारशी दोन हात करण्यात मागे पुढे पाहिले नाही. जिथे जिथे अन्याय घडला तिथे तिथे बाबुरावांचा तरूण भारत सर्वप्रथम पोहचला. संबंधित व्यक्तिवरील अन्याय दूर करून संबंधित व्यक्तिला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. तरूण भारतचे हाताळलेल्या अनेक प्रकरणापैकी दोन प्रकरणांचा उल्लेख समोचित आहे. संपूर्ण बेळगाव व आसपासच्या परिसर हादरून सोडला होता त्यापैकी (१)पांगीरे प्रकरण व (२) ज्योतीराम राजगिरे प्रकरण हे होय.

सौ.काशीबाई हणबर प्रकरण ( पांगीरे प्रकरण ):

कोल्हापूर संस्थानाच्या हद्दीतील पांगीरे ( तालुका गडहिंग्लज ) गावच्या सौ. काशीबाई हणबर हीचा मुलगा मलाप्पा आप्पाजी हणबर हा १९४२ च्या चलेजाव आंदोलनात भाग घेऊन भूमीगत झाला होता.

..

त्यामुळे तो पोलिसाना हवा होता. त्याची माहिती काढण्यासाठी पोलिसांनी संबंधित लोकाना बरीच माराहाण केली [६५]. त्यात पांगीरे गावचे नरसगौडा पाटील, त्यांची दोन मुले बापूसाहेब व आप्पासाहेब पाटील. मल्लप्पाचे वडील आप्पाजी हणबर यांचाही समावेश होता. पण पोलिसानी अन्यायाचा कळस गाठला. सौ. काशीबाईच्या बाबतीत. मुलाचा ठावठिकाणा सांगत नाही म्हणून फौजदार इंगवले हरी तातोबा याने दिनांक १९-१०-१९४४ रोजी काशीबाई हणबरला नग्न करून भिजलेल्या कातडी पटयाने रक्तबंबाळ होईतोपर्यंत फोडून काढले. तीन महिन्याची गरोदर आहे हे तीने सांगुनसुध्दा त्याने तारीख २०-१०-१९४४ रोजी काशीबाईच्या जननेंद्रियात तिखट वापरून मानवतेला काळीमा फासणारा प्रकार केला [६६]. फौजदार इंगवलेच्या अत्याचार व मारामुळे सौ.काशीबाईला रक्तस्त्राव होऊन गर्भपात झाला [६७]. या अन्याया विरुध्द न्यायमिळावा म्हणून तीने कोल्हापूर संस्थान पंतप्रधान मा.ना.मिचेल व पोलीस प्रमुख मि.साद्री यांच्याकडे अर्ज केला [६८]. पण संस्थानी सरकारचे धोरण फौजदार श्री.इंगवलेस पाठीशी घालणारे होते. तिची एलबर्ट हॉस्पिटल, कोल्हापूर, मध्ये वैद्यकीय तपासणी करून तिला कांहीच होत नाही असे सांगून त्यानी तिची परत बोळवण केली [६९].

एवढा भयंकर अत्याचार एका निष्पाप, निरापराध अबलेवर होऊन सुध्दा सर्व वृतपत्रे ( महाराष्ट्रातील ) मुग गिळून बसली होती. या पोलिस अत्याचारास सर्व प्रथम वाचा फोडण्याचे कार्य निर्भिडपणे, कसल्याही दबावास बळी न पडता बाबुरावांनी केले. दिनांक २४-१०-१९४४ च्या अंकात " कोल्हापूर संस्थान: राणीच्या राज्यात स्त्रीच्या अब्रुचे धिडवडे " भरदिवसा चावडी समोर नग्न करून स्त्रीवर पोलिसांचा अत्याचार ", एका अबलेची करूण कहाणी " या मथळयाखाली सर्ववृतांत प्रसिध्द करून

..

स्वत: जाणी सरकारने लक्ष घालून संबंधित पोलिस अधिका-याना शासन करावे अशी मागणी केली [७०]. बाबुराव केवळ बातम्या देऊन थांबले नाहीत तर तिला न्याय मिळवून देण्यासाठी सक्रीय प्रयत्नास लागले. कोल्हापूर जिल्हा पोलिस प्रमुखांनी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी श्री. राजे ( ए.एस.पी. ) यांची नियुक्ती केली होती. त्या अधिका-याची श्री.बाबुराव यांनी निप्पाणी येथे समक्ष भेट घेऊन सदर प्रकरणाची नि:पक्षापणे चौकशी करण्याची विनंती केली. पण श्री. राजे ( ए.एस.पी. ) पक्षापातपणे आरोपीस पाठीशी घालतात हे दिसून आल्यावर दि.९-१२-४४ रोजी मिचेल पंतप्रधान, कोल्हापूर व श्री. साद्री ( एस.पी.,कोल्हापूर ) यांच्याकडे परत विनंती पाठविण्यात आली. पंतप्रधान मि.मिचेल यानी दोन पत्रकार परिषदा घेऊन सौ.काशीबाई हणबर विरुध्द बाजू मांडली [७१]. यावरून पंतप्रधान हे प्रकरण दडपून टाकत असल्याचे दिसताच बाबुरावांनी दिनांक ५-१२-१९४४ च्या अंकात पोंगी-याच्या काशीबाई हणबरवरील अत्याचाराची हकीकत सर्वस्वी खरी आहे [७२] या मथळयाखाली लेख लिहून स्वतंत्र न्यायाधीशामार्फत या प्रकाराची चौकशी करण्यात यावी असे आवाहन केले.

या प्रकरणात न्याय देण्यात सरकार उदासिन होते. तरी तरूण भारतने प्रसिध्दी दिल्यामुळे जनमत तयार होऊ लागले होते. अनेक संघटनांनी विशेषत: महिलांनीसौ.काशीबाईला न्या मिळावा यासाठी कंबर कसली होती. बेळगाव येथील लेडीज क्लब, महिला सेवा समाज, आदर्श महिला मंडळ, आखिल भारतीय महिला मंडळ यानी पोलीस अत्याचाराचा निषेध करून या प्रकरणाची नि:पक्षापाती चौकशी करण्याची व दोषी अधिका-याना शिक्षा करण्याची पंतप्रधान मा.ना.मिचेल यांच्याकडे मागणी केली [७३]. जनमताच्या दबावामुळे कोल्हापूर जिल्हा पोलीस प्रमुख श्री.साद्री यानी या प्रकरणाची स्वत: चौकशी करण्याचे आश्वासन

..

दिले. त्यानी एकूण ४८ लोकांच्या साक्षी घेऊन बाईवर अन्याय झालाच नाही असा निष्कर्ष जाहीर केला [७४]. त्यानी प्रमुख साक्षीदार सौ.काशीबाई व रखमाबाई चव्हाण ( मनुचीवाडी येथील रहिवासी, जिच्यासमोर गर्भपात झाला होता ) यांची साक्ष घेतली नव्हती. पण ज्यांचा या प्रकरणाशी संबंध नाही अशा लोकांच्या खोटया साक्षी घेतल्या होत्या. तेंव्हा तरुण भारतने त्यानी उपस्थित केलेले सर्व मुद्दे खोडून काढून, न्यायाची बाजू घेऊन संस्थानचा लौकीक वाढावा म्हणून स्वतंत्र चौकशीची मागणी केली.

मि.साद्री यांच्या एकतर्फी निष्कार्षावर प्रथमत: मुंबईच्या वृतपत्रांनी टीका केली व ना.मुन्सी ( गृहमंत्री, मुंबई राज्य ) व बॅ.जपे ( मुंबई ) या दोन प्रतिष्ठीत कायदे पंडितानी मि.साद्रीच्या निष्कर्षावर टीका करून या प्रकरणाची पुन्हा चौकशीची मागणी केली [७५]. बाबुरावांनी या संदर्भात अनेक अग्रलेख लिहीले. यापुढे जावून त्यानी एक विशेषांक काढला व या प्रकरणाचा सविस्तर आढावा घेतला.

दिनांक ९-१२-१९४४ रोजी श्री.बाळासाहेब खेरांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेच्या संम्मेलनात बाबुरावांनी पांगीरे प्रकरण सविस्तरपणे मांडून न्याय मागितला. परिणामत: या संम्मेलनात ॲड. श्रेष्ठींच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणाची चौकशी करण्याकरिता एक समिती स्थापन केली [७६].

श्रेष्ठी समितीने या प्रकरणात जातीने लक्ष घातले. संबंधित स्थळे, व्यक्तिना भेटले, संबंधितांचे जबाब घेतले व त्यांच्या आधारे दिनांक १३-२-१९४५ रोजी आपला अहवाल प्रसिध्द केला [७७]. त्यात पांगीरे प्रकरणात अन्याय झाल्याचे नोंद करून, या प्रकरणाची न्यायालयीन

..

चौकशी व्हावी अशी मागणी मा.ना.मिचेल ( पंतप्रधान, कोल्हापूर ) यांच्याकडे केली. पण ती मान्य झाली नाही. हे होईतो, खुद माधवराव बागला यानी नंतर " हिंद मातेची विटंबना " [७८] या नावाचा अग्रलेख लिहून केवळ पांगीरे गावातील काशीबाईची विटंबना नव्हे तर संपूर्ण हिन्द मातेची विटंबना आहे असे सडेतोड मत व्यक्त केले.

कोल्हापूरात विद्यार्थ्यांनीसुध्दा मोर्चा काढून, न्यायालयीन चौकशीची मागणी केली. अखिल भारतीय महिला परिषद, मुंबई शाखेने काशीबाईस न्याय मिळवून द्यावा अशी विनंती मा.ना.मिचेल याना केली [७९].

इतकेच नव्हे तर बाबुरावांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी याना सुध्दा या प्रकरणाची माहिती कळविली [८०]. शेवटी मिचेल याना प्रक्षुब्ध जनमताची दखल घेऊन काशीबाईस फिर्याद देण्यास मान्यता दिली. आणि १० जून १९४७ रोजी कोल्हापूर न्यायालयासमोर हा खटला सुरू झाला. काशीबाई तर्फे इस्लामपूरचे ॲड. कुलकर्णी एस.आर. व ॲड. लागू यानी काम पाहिले, तर कोल्हापूर दरबारातर्फे ॲड.ब्रम्हदंडे व ॲड.राणे यानी काम पाहिले. कोल्हापूर फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट श्री. शेख यानी आरोपीवर आरोप ठेवून हा खटला सेक्शन कोर्टाकडे सुपूर्त केला [८१]. सेशन जज्ज ( कोल्हापूर ) श्री.शेटये यानी दिनांक १३-३-१९४८.रोजी निकाल दिला. फौजदार श्री.इंगवलेस ६ महिन्याची कैद व सातशे रूपये दंड अशी शिक्षा दिली [८२].

पोलिसानी सौ.काशीबाई, तिचा नवरा, नरसगौडा पाटील, त्याची दोन मुले, पांगी-याचे दोन सनदी यांच्यावर विशेषत: स्त्री देहाची विटंबना करणारे जे अत्याचार केले होते. त्याविरूध्द तरूण भारतमधून बाबुरावांनी आवाज उठवून जनमत तयार करून काशीबाई सारख्या खेडवळ, अशिक्षित अबलेस वेळाने का होईना ( प्रकरणाची सुरूवात ता.१९-१०-४४ ला सुरूवात व निकाल ता.२३-३-१९४८ ) पण न्याय मिळवून दिला.

..

शेवटी पांगीरे प्रकरणाचा निकाल लागताच " प्रतिकूल परिस्थितीतही न्याय देवता जागृत राहिली " [८३] या मथळ्याखाली संपादकीय लिहून ज्यानी ज्यानी न्याय मिळवून देण्यासाठी मदत केली त्यांचे आभार मानले. पांगीरे प्रकरण धसास लावल्याबद्दल श्री.माधवराव बागल यानी तरुण भारते संपादक बाबुराव ठाकूर यांचे अभिनंदन केले [८४]. बाबुराव ठाकूर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, सर्व बाजूनी सरकारी, व गैर सरकारी दबाव आला असतानाही जाणीवपूर्वक परीक्षा घेऊन एका अबलेस न्याय मिळवून दिला, म्हणून बेळगाव परिसरातील लोक त्यांच्याकडे आदराने पाहू लागले. या परिश्रमाचे पारितोषिक सोलापूरच्या पत्रकार परिषदेत त्यांना मिळाले. सोलापूरच्या २४ व्या पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदावरून श्री.दा.वि.गोखले यानी श्री बाबुराव ठाकूर यांना अन्याय व जुलूम चव्हाटयावर आणून लोकमत जागृत करून, लोक दबावाखाली अशिक्षित काशीबाईस न्याय मिळवून दिला, म्हणून धन्यवाद दिले [५६]. यावरून बाबुरावांनी लेखनी व पत्रकारिता किती धारदार होती हे दिसून येते.

ज्योती रामा राजगिरे प्रकरण:

ज्या संयमाने, निर्धाराने, पोडतिडकीने बाबुरावानी सौ.काशीबाई हणबर प्रकरणात बाजू उचलून धरली होती. त्याच निर्धाराने त्यांनी ज्योती रामा राजगिरच्या पाठीशी उभे राहिले.

ज्योती रामा राजगिरे हा मराठा, मध्यम वर्गीय शेतकरी कुटुंबातील पट्टणकुडीचा ( तालुका निप्पाणी ) रहिवासी होता. त्याच गावच्या श्री.विठल मोसलेच्या घरी ता.२४-८-१९५२ रोजी झालेल्या चोरीच्या प्रकरणी हवालदार श्री.कामतेनी ता.२८-८-१९५२ रोजी ज्योतीस चोरीच्या

..

आरोपाखाली अटक करून निपाणी पोलीस लोकअप मध्ये डांबले [८५]. तेथील मयान मारामुळे तो मरण पावताच पोलीस हवालदार श्री.कामतेने त्यांच्या प्रेताची विल्हेवाट लावली. आपल्या नव-याची आठ दिवस सतत चौकशी करूनही पत्ता लागत नाही, असे दिसताच ज्योतीच्या पत्नीने - सौ.जनाबाई राजगिरेने मा.ना.मुरारजी देसाई ( मुख्यमंत्री, मुंबई राज्य ) व बेळगावच्या जिल्हाधिका-याना तार करून चौकशीची विनंती केली [८६]. दोन महिने झाले तरी ज्योती प्रकरणास सरकारकडून कांहीच हालचाल झाली नाही म्हणून निप्पाणीचे श्री.बाळकृष्ण पटवर्धन मास्तरानी बाबुरावाना पत्र पाठवून ज्योती बेपत्ता असल्याची माहिती देऊन पोलीस माराहणीत त्याचा मृत्य झाला असल्याची शंका व्यक्त केली. आणि या प्रकरणात जातीने लक्ष घालून न्याय मिळवून देण्याची विंती केली.

एव्हाना सत्यासाठी झगडणारा, सत्य वेशीवर टांगून सरकार व जनतेचे त्याकडे लक्ष वेधनारे अशी बाबुरावांची प्रतिमा तयार झाली होती. श्री.पटवर्धन मास्तरांचे पत्र मिळताच बाबुरावांनी स्वत: पटणकुडी व निपाणीस भेट देऊन श्री.खोत ( डी.वाय.एस.पी. ) यांची भेट घेऊन या प्रकरणाची नि:पक्षापाती चौकशी करण्याची विनंती केली [८७].

एका निष्पाप, निरपराध, गरीब शेतक-यास चोरी, दरोडेखोरी, खून, मारामारी, बलात्कार, यासारख्या कोणताच गुन्हा नसताना ज्योतीस पोलीस लॉक-अपमध्ये डांबतात काय ? आणि त्यांच्या कुटुंबियाना साधी माहितीसुध्दा देत नाहीत या अन्यायाविरुध्द बाबुरावातील पत्रकार पेटून उठला.

' पटणकुडीच्या ज्योती राजगिरेची दुर्दैवी कहानी , या घटनेचा उलघडा झालाच पाहिजे ' , हे काय लोकशाही राज्य आहे काय ? ' ' राजगिरची चौकशी करून खरा प्रकार जाहिर करावा ' [९०] इत्यादि

..

शीर्षकाखाली बाबुरावांनी जळजळीत लेख लिहीले. तरूण भारतमध्ये या प्रकरणास प्रसिध्द मिळताच निपाणीच्या जाहीर सभेतून (४-१०-१९५२) ज्योतीच्या चौकशीची मागणी करण्यात आली [९१]. परिणामत: लोक दबावामुळे सरकारने ता.१०-१०-१९५२ रोजी खास वटहुकूम काढून श्री.एस.एस.वाली ( कलेक्टर, पर्सनल ॲसिस्टंट ) यांची ॲडिशनल मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक करून त्यांच्याकडे चौकशीकरिता ज्योती रामा राजगिरे प्रकरण सोपविले [९२].

श्री.वाली यांनी प्राथमिक माहितीच्या आधारे, श्री.कामते हवालदार यास निलंबीत केले व इतर संबंधित पोलीस व अधिका-यांच्या बेळगावला बदल्या केल्या. बाबुरावांनी ज्योतीची पत्नी सौ.जनाबाईची -हदयद्रावक कैफीयत तरूण भारत मधून प्रसिध्द करून [९३] लोकांच्या भावनेला हात घातला. परिणामत: चौकशीस वेग आला.

चौकशी अंती हवालदार आप्पा रामा कामते यांचेवर इ.पी. कोड ३०२ ( खुनाचा आरोप ) सोबत ३४ आणि २०१, सोबत ३४ या किंवा वैकल्पिकरित्या कलम २०१ ( इ.पी.कोड ) आरोपाखाली तर आरोपी नं. २ ते ७ ( श्री.हलप्पा कल्लप्पा धनगर (पोलीस), इमाम मियासाहेब (पोलीस), सिद्राम बसाप्पा हुग्गार (हवालदार), विष्णु हणमंत कोपार्डे (हवालदार), इस्माईल धुडु (हवालदार), श्री.रामचंद्र दिपाजी (ड्रील मास्तर), यांनी श्री.कामतेस गुन्हा करण्यास मदत केल्याच्या व २०१ कलमाखाली म्हणजे पुरावा नाहीसा करण्यासाठी मदत केल्याच्या आरोपाखाली तसेच फौजदार श्री.दुदूंर एम.एच. यांचेवर गुन्हा दडपून टाकण्याच्या कामी प्रयत्न व मदत केल्याबद्दल कलम २०१ व कलम १०९ इ.पी.कोड १८६० या खाली मुंबई सरकारने खालील आरोपींना सस्पेंड ठेवून त्यांच्यावर खटले भरण्यास मंजूरी दिली [९४]. त्या आरोपींची नावे खालीलप्रमाणे आहेत.

..

| अ.नं. | आरोपीचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १) | श्री. आप्पा रामा कामते | हवालदार |
| २) | श्री. हल्लाप्पा कल्लाप्पा धनगर | पोलिस |
| ३) | श्री. इमाम मियासाहेब | पोलिस |
| ४) | श्री. सिद्राम बसवण्णाप्पा हुग्गार | हवालदार |
| ५) | श्री. विष्णु हणमंत कोपार्डे | हवालदार |
| ६) | श्री. इस्माईल धुडू | हवालदार |
| ७) | श्री. रामचंद्र दिपाजी | ड्रील मास्तर |
| ८) | श्री. एम.एच.दुंदूर | सब इन्स्पेक्टर |

मुंबई सरकाच्या आदेशानुसार वरील आरोपीना श्री. वाली एस.एस. यानी सास्पेंड करून ता.३०-१-१९५३ रोजी चिकोडी येथील मॅजिस्ट्रेट श्री.हेगडे यांच्या कोर्टात फिर्याद दाखल केली [९५]. हा खटला चिकोडीचे रेसिडेन्सीयल मॅजिस्ट्रेट श्री.हेगडे यांच्यापुढे सुरू होऊन सौ.जनाबाई राजगिरे ( पत्नी - ज्योती रामा ), श्री.लक्ष्मण निंबाजी सावंत ( आरोपी नं.२ ), यशवंत गोपाळ गायकवाड ( रिटायर्ड पोलिस स्टेशन शेजारी) म्हादू चौगुले ( ट्रक ड्रायव्हर ) सौ.शाकुंतला तडस, श्री.अब्दुल अजीज हुसेन बागवान ( रा.पटणाकुडी, नोकरी सैर मंहमदकडे ) पटणाकुडीचे पोलीस पाटील श्री.रायगौंडा आप्पागौंडा पाटील, श्री.एस.एस. वालीसाहेब ( चौकशी अधिकारी ) इ.च्या साक्षी झाल्या व मॅजिस्ट्रेट साहेबानी कोर्टापुढे आलेल्या माहितीच्या व पुराव्यांच्या आधारे सर्व आरोपीवर चार्ज ठेवून सदर गुन्हयाची चौकशी सेशन कोर्टात व्हावी म्हणून हा खटला सेशन कोर्टाकडे वर्ग व्हावा असा निकाल ता.२७-५-५३ रोजी दिला [९६].

राजिगरे खुन खटला महत्वाचा असल्याने मुंबई सरकारने तो चालविण्यासाठी मुबई हायकोर्टाचे सरकारी प्लीडर ॲड.श्री.अनंतराव मंडगी यांची नेमणूक केली होती. तर आरोपीच्यावतीने बेळगावचे ॲड.लेले व ॲड.मुजूमदार, चिकोडीचे वकील ॲड.जकाती, ॲड.मुंडरगी व ॲड.पठाण यानी काम पाहिले.

ज्योती रामा राजगिरे खटला बेळगाव सेशन कोर्टात:

बेळगाव सेशन कोर्टात खालील आरोपीवर ता.२८-५-१९५३ रोजी राजीगरे प्रकरणी खटला दाखल करण्यात आला [१७].

| आरोपी नंबर | आरोपीचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १) | श्री. आप्पा रामा कामते | हवालदार |
| २) | श्री. सिद्राम बसवण्णाप्पा हुग्गार | हेड कॉन्स्टेबल |
| ३) | श्री. हल्लाप्पा कल्लाप्पा धनगर | पो.कॉन्सटेबल |
| ४) | श्री. इमाम मियासाहेब | पो.कॉन्स्टेबल |
| ५) | श्री. विष्णास हणमंत कोपर्डे | हवालदार |
| ६) | श्री. इस्माईल धूडू | हवालदार |
| ७) | श्री. रामचंद्र दिपाजी | ड्रील मास्तर |
| ८) | श्री. विष्णु रामा होदगार | सनदी |
| ९) | श्री. बाबु आपण्णा बेरड | सनदी |
| १०) | श्री. एम.एच.दुंदूर | फौजदार |

सेशन कोर्टात एकूण ४२ लोकांच्या साक्षी घेण्यात आल्या. बाबुरावांचीसुध्दा साक्ष घेण्यात आली. फौजदार दुंदूरानी आपल्या

..

साक्षीत बाबुरावांचा उल्लेख Baburao is a blacksheep of Society असा उल्लेख केला, तर श्री.पटवर्धनाना smuglar म्हटले, तर श्री.जनार्धन पवार या दुस-या साक्षीदारास Mischief Monger ची पदवी दिली [९८]. पण फौजदार दुंदूरांची डाळ शिजली नाही. सेशन कोर्टात एकूण ४२ लोकांच्या साक्षी घेण्यात आल्या व त्या आधारे ता.२१-९-१९५३ रोजी सेशन कोर्टाने निकाल दिला [९९]. हवालदार कामत व हेड कॉन्स्टेबल हुग्गार याना सर्वानुमते दोषी ठरले तर फौजदार दुंदूर याना ४ विरुध्द १ च्या बहुमताने दोषी ठरविण्यात आले. बाकीचे सर्व आरोपी सर्वानुमते निर्दोष सुटले.

आरोपी नंबर २ श्री.हुग्गार ( हेड कॉन्स्टेबल ) व आरोपी नंबर १०, फौजदार श्री.दुदूंर यांचे प्रकरण अखेरच्या निर्णयासाठी हायकार्टाकडे सोपविण्यात आले. सेशन जज्ज श्री.कात्रे यानी अखेरच्या निर्णयासाठी आरोपी नंबर १, २ व १० ( हवालदार कामते, हेड कॉन्स्टेबल हुग्गार व फौजदार दुंदूर ) यांचे प्रकरण हायकोर्टाकडे सोपविले.

ता.१६-२-१९५४ रोजी मुंबई हायकोर्टात न्या.प्र.बा.गजेंद्रगडकर व न्या.व्यास यांच्यापुढे ज्योती खटल्याची सुनावणी सुरू झाली. ता.१९-२-५४ रोजी या खटल्याचा निकाल लागला [१००]. हवालदार कामते यास ५ वर्षे, हेड कॉन्स्टेबल हुग्गार यास ४ वर्षे सक्त मजूरी आणि ठिू हदिगार व बाबू बेरड ( दोघेही सनदी ) याना प्रत्येकी ३ वर्षे सक्त मजूरी आणि फौजदार दुंदूर व आरोपी नं. ३ ते ७ निर्दोष आहेत असा निकाल दिला.

निपाणी पो.स्थेशनमध्ये गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडूनही याची चौकशी होत नाही, असे दिसताच श्री.जनार्धन पवार, बाळकृष्ण पटवर्धन, या समाज सेवकांनी व तरूण भारतचे संपादक बाबुराव ठाकूर यानी

..

वृतपत्रकार या नात्याने अन्याय चव्हाटयावर मांडला म्हणून न्यायमूर्तींनी आपल्या निकाल पत्रात त्यांची प्रशंसा केली आहे [१०१].

तरूण भारतने अनेक लेख लिहून समाज जागृती करून या प्रकरणाकडे सरकारचे लक्ष वेधले. त्यामुळे राजगिरेची चौकशी करण्यासाठी सरकारने समिती नेमली. त्यामुळे हे प्रकरण उघडकीस आले. Times of India या वृतपत्राने आपल्या पत्रात श्री.बाबुराव ठाकूर यांची स्तुती करून धन्यवाद दिले आहेत [१०२]. श्री.बाळकृष्ण पटवर्धन व श्री.बाबुराव ठाकूर यांच्या प्रयत्नामुळे राजगिरे कुटुंबास न्याय मिळाला. त्यामुळे ' तरूण भारतचे ' नाव सर्वतोमुखी झाले व गरीबाचा आश्रयदाता , न्यायदाता, म्हणून बेळगाव परिसरातील सर्वसामान्य माणूस बाबुराव ठाकूर यांच्याकडे पाहू लागला म्हणूनच जनता त्यांना ' काका ' ( पितृछत्र ) म्हणू लागली.

बाबुरावांचे वृतपत्र क्षेत्रातील कार्य तरूण भारत पुरते सिमित नव्हते. मुंबई, मराठीपत्रकार संघाच्या स्थापनेतं ( २२-६-१९४१ )कार्यांत अधिवेशनात बाबुरावांचा सक्रीय सहभाग होता. हा संघ वाढीस लागावा म्हणून त्यानी जातीने प्रयत्न केले होते. या संघाच्या १० व्या पत्रकार संघाच्या बेळगाव ( १९५० ) येथे भरलेल्या अधिवेशनाचे बाबुरावांनी स्वागताध्यक्षपद भूषविले होते [१०३].

बाबुराव ठाकूर एक वृतपत्रकार म्हणून जनतेत लोकप्रिय नव्हते, तर वृतपत्र क्षेत्रातही लोकप्रिय होते. ८ जानेवारी,१९५४ रोजी झालेल्या ' तरूण भारत ' रौप्य महोत्सव समारंभात पुणे, मुंबई, औरंगाबाद, धुळे, कोल्हापूर, अमरावती इत्यादि लांब ठिकाणच्या वृतपत्र संपादकाचे शुभसंदेश आले होते. माजी केंद्रीय मंत्री काकासाहेब गाडगीळ यानी या समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविले होते. मुरारजी देसाई( मुख्यमंत्री,

..

मुंबई राज्य ), भाऊसाहेब हिरे ( महसूल मंत्री, मुंबई राज्य ), मालोजीराव नाईक निंबाळकर ( आरोग्यमंत्री, मुंबई राज्य ), बी.जी.खेर,( भारतीय राजदूत, लंडन ), सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे, पार्वतीदेवी राणीसाहेब (राजमाता, सावंतवाडी) इत्यादि महत्वाच्या व्यक्तिंचे शुभसंदेश त्याना मिळाले होते [१०४].

बाबुरावांची पत्रकारिता बेळगाव व महाराष्ट्रात खुप गाजली. ते एक धडाडीचे, निर्भिड, पत्रकार म्हणून उदयास आले. ' पतनात ययते इतिपत्र ' हा पत्रकार शब्दाचा अर्थ आहे, म्हणजे ज्या प्रमाणे तृण पत्रावर पावसाचे दव बिंदू पडले तरी ते एकदम जमिनीवर पडत नाहीत. काही वेळ तेथेच थांबतात. हे दृष्य पाहून एका दृष्टयाने पत्र या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ' पतनापासून संरक्षण करते ते पत्र ' [१०५]. बाबुराव ठाकूरानी हे तत्व आपल्या पत्राच्या बाबतीत तंतोतंत पाळले.

-000-

## संदर्भ सूची


१) कानडे,आर.जी.,मराठी नियतकालीकांचा इतिहास, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९३८, पान १०.

२) नटराजन, एम., ए हिस्ट्री ऑफ प्रेस इन इंडिया, अशिया पब्लिशिंग हाऊन, बॉम्बे, इंग्रजी, १९६२, पान १४.

३) कित्ता: पान १९.

४) कित्ता:

५) कित्ता:

६) कानडे,आर.जी.,उपरोक्त, पान ३२.

७) डॉ.राव,वसंत डी., दि.बिगीनींग ऑफ दि मराठी प्रेस, दि इंडियन प्रेस ( इडीटेड डॉ.सेन एस.पी.), १९६६, पान ५६.

८) अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.१२-२-१९५०, पान २.

९) मासिक, तरूण भारत, बेळगाव, जुलै १९१९, पान २०.

१०) कित्ता: पान २२.

११) कित्ता: 23

१२) तरूण भारत, बेळगाव, ता.१२-२-५०, पान २.

१३) मासिक, तरूण भारत, बेळगाव, जुलै,१९१९, पान १.

१४) कित्ता: पान १ व २.

१५) कित्ता: जुलै १९१९, पान २.

१६) कित्ता: पान ३.


..

१७) कित्ता:

१८) कित्ता: पान ४.

अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.८-१-५४, पान २.

१९) मासिक, तरुण भारत, बेळगाव, जुलै १९१९, पान ३६.

२०) कित्ता: पान ३३.

२१) मासिक, तरुण भारत फाईल्स, १९१९-१९२४.

२२) मासिक, तरुण भारत, बेळगाव, नोव्हेंबर,१९२०, पान २०.

२३) कित्ता: डिसेंबर १९१९, पान २, ६.

२४) कित्ता: पान २५.

मासिक, तरुण भारत, बेळगाव, जानेवारी-फेब्रुवारी,१९२१, पान ९४.

२५) कित्ता: पान १०५, व एप्रिल १९२१, पान १४७

२६) मासिक, तरुण भारत, बेळगाव, फाईल्स १९१९-२४.

२७) मासिक, तरुण भारत, बेळगाव, जुलै १९१९, पान ३३ व सप्टेंबर १९१९, पान ३.

२८) मासिक, तरुण भारत, बेळगाव, माहे जून १९२१, पान २.

२९) कित्ता: जुलै १९२३, पान २.

३०) कित्ता: जून १९२४, पान २ व ५.

३१) मासिक, तरुण भारत, बेळगाव, मार्च-एप्रिल,१९२०, पान ३.

३२) सौ.प्रभू प्रिया, समरांगण हे जीवन ज्यांचे, मे १९७५ पान ५-६.

..

३३) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.१-८-२८, पान १.

३४) कित्ता:

३५) मासिक, तरुण भारत, बेळगाव, फाईल्स १९१९-२४.

३६) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, फाईल्स १९२८-४०.

३७) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, फाईल्स १९४०-४८ ,
व अर्धसाप्ताहिक, फाईल्स, १९४९-५५.

३८) साप्ताहिक व अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, फाईल्स
१९२८-५५.

३९) कित्ता:

४०) कित्ता: फाईल्स, १९३५-५५.

४१) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.२-१-४०, पान ४.

४२) साप्ताहिक, व अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, फाईल्स १९३३-५५.

४३) कित्ता: फाईल्स १९३३-५५.

४४) साप्ताहिक, व अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, फाईल्स १९२८-५५.

४५) अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.१-१-४९, पान १.

४६) मासिक व अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, फाईल्स १९१९-४७.

४७) कित्ता:

४८) मासिक, तरुण भारत, फाईल्स १९१९-२४.

४९) मासिक व साप्ताहिक, तरुण भारत, फाईल्स, १९१९-४८.

५०) मासिक, तरुण भारत, बेळगाव, जुलै १९१९, पान ४,
मासिक तरुण भारत, फाईल्स, १९१९-२४.

..

५१) मासिक, तरुण भारत, बेळगाव, नोव्हेंबर १९२२, पान २३.

५२) कित्ता:

५३) कित्ता: जून १९२४, पान २ व ६.

५४) मासिक, तरुण भारत, बेळगाव, फाईल्स १९१८-२०.

५५) कित्ता: फाईल्स १९२१ ते २४.

५६) साप्ताहिक व अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, फाईल्स, १९२८-४८ व १९४९-५५.

५७) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, फाईल्स, १९२८-३३.

५८) कित्ता: फाईल्स, १९३४-४५.

५९) साप्ताहिक व अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, फाईल्स १९४६-५२.

६०) अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, फाईल्स, १९५३-५५.

६१) अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, मे १९७५, पान २५.

६२) साप्ताहिक तरुण भारत, बेळगाव, ता.६-१०-१९४२, पान १.

६३) तरुण भारत पागीरे प्रकरण खासअंक ता.१०-४-४५, पान २, ता.५-१२-४४, पान १०.

६४) अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.२८-८-५३, पान २.

६५) साप्ताहिक, तरुण भारत, ता.२४-१०-४४, पान १.
तरुण भारत पांगीरे प्रकरण खासअंक, १०-४-४५, पान १.

६६) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.१९-१२-४४, पान ३.

६७) कित्ता: उपरोक्त, पान ६१.

..

६८) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.३१-१०-४४, पान ४.

६९) सौ.प्रभू, प्रिया, उपरोक्त, पान ५८.

७०) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२४-१०-४४, पान १.

७१) कित्ता: ता.५-१२-१९४४, पान १०.
तरूण भारत पांगीरे प्रकरण खास अंक, ता.१०-४-४५, पान २.

७२) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.५-१२-४४, पान १०.

७३) तरूण भारत, पांगीरे प्रकरण खास अंक, ता.१०-४-४५, पान ३.

७४) कित्ता: ता.१०-४-४५, पान ९.

७५) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२६-१२-४४, पान ७-८.

७६) कित्ता: ता.१२-१२-४४, पान १.
साप्ताहिक, अखंड भारत, कोल्हापूर, ता.१४-१२-४४, पान ८.

७७) कित्ता: ता.१-३-४५, पान १.
साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.१४-२-४५, पान ४ व
ता.३०-३-४८ , पान २.

७८) साप्ताहिक, अखंड भारत, कोल्हापूर, ता.२८-१२-४४, पान १.

७९) तरूण भारत, पांगीरे प्रकरण खास अंक पान १३-१४.
साप्ताहिक, दक्षिण महाराष्ट्र, सांगली, ता.२२-१२-४४, पान २.

८०) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.१०-१-४५, पान ४.
उपरोक्त, ता.१०-५-४५, पान ८.

८१) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.३०-३-४८, पान ३.

..

८२) किता: ता.३०-३-४८, पान २.

८३) किता:

८४) साप्ताहिक, अखंड भारत, कोल्हापूर, ता.१०-५-४५, पान ८.

८५) अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.३०-९-५२, पान १.

८६) किता:

८७) किता:

८८) किता:

८९) सौ.प्रभु, प्रिया, उपरोक्त, पान ६६.

९०) अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, ता.३०-९-५२, पान १.

९१) अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, पान ७-१०-५२, पान १.

९२) किता: ता.२१-१०-५२, पान १ व ता. ११-९-५३ पान ३.

९३) किता: ता.२८-१०-५२, पान १ व ३.

९४) किता: ता.३०-१-५३, पान १.

९५) किता: ता.६-२-५३, पान ३.

साप्ताहिक, लोकमत, बेळगाव, ता.३-७-५३, पान ४.
साप्ताहिक, बेळगाव समाचार, ता.३०-५-५३, पान ५.
अर्ध साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.२९-५-५३, पान १.

९७) किता: पान १.,

९८) किता: ता.१५-९-५३, पान १.

९९) किता: ता.२२-९-५३,
साप्ताहिक, लोकमत, बेळगाव, ता. २७-९-५३, पान ५.

..

१००) अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२२-२-५४, पान १.
साप्ताहिक बेळगाव समाचार, ता.२०-२-५४, पान ७.
साप्ताहिक लोकमत, बेळगाव, ता.१९-२-५४, पान ४.

१०१) अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.५-३-५४, पान १-२.

१०२) किता: पान ४.

१०३) अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.१२-२-५०, पान १.
साप्ताहिक, बेळगाव समाचार, ता.१८-२-५०, पान २.

१०४) अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.८-१-५४, पान १.

१०५) सौ.प्रभू,प्रिया, उपरोक्त, पान १०५-१०६.

-000-